**प्रेसनोट दिनांक – २९/१०/२०२४**

# पिंपरी चिंचवड पोलीसांची संघटीत गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन करण्यासाठी विष्णु पवार टोळी, राजु देशमुख टोळी, बाळासाहेब बांगर टोळी, सुरज रणदिवे टोळी या टोळयांवर "मोका अंतर्गत कारवाई"

मा.पोलीस आयुक्त, श्री.विनय कुमार चौबे, यांनी आगामी विधानसभा निवडणुकीचे पार्श्वभुमीवर सदरची निवडणुक ही भयमुक्त व पारदर्शक व नि:पक्षपातीपणे पार पाडता यावी यासाठी व्यापक प्रतिबंध कारवाईचा आराखडा तयार केला असुन त्या अंतर्गत पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीतील गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवणेसाठी शरिराविरुध्दचे व मालाविरुध्दचे गुन्हे करणारे व लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्याबाबत पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश दिले आले आहेत. **मा.पोलीस आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली सन २०२४ मध्ये आजपावेतो पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील ३० संघटीत गुन्हेगारी टोळयांमधील एकुण १७५ आरोपींवर मोका कायद्यांतर्गत कारवाई केली आहे.**

**१) हिंजवडी पोलीस ठाणे** गु.र.नं ८९०/२०२४ बी.एन.एस. कलम ११०, १२७(२), १३१, १८९(२), १८९(४), १९१(३), १९०, ११५(२), ३२४(२), ३५१(२), ३५२ क्रि. लॉ. ॲमे. ॲक्ट कलम ७, आर्म ॲक्ट कलम ४(२५), महा.पो. कायदा कलम ३७(१)(३) सह १३५ या गुन्हयाचे तपासामध्ये आरोपी नामे **१) विष्णु दिगंबर पवार (टोळी प्रमुख)** रा. मातोश्री हॉस्पीटल मागे, वडगाव मावळ ता.मावळ जि.पुणे **२) करण राहुल लोखंडे** वय १९ वर्षे रा. मशिदीजवळ, काळाखडक वाकड पुणे **व इतर ०४** यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. **सदर टोळी प्रमुख व त्याचे साथीदार यांच्यावर एकुण ०९ गुन्हे केल्याची नोंद आढळुन आलेली आहे.**

**२) सांगवी पोलीस ठाणे** गु.र.नं. ३०६/२०२४ बी.एन.एस. कलम १०९, १८९(२)(४), १९०, १९१, ३५१(२), ३५२, आर्म ॲक्ट कलम ४ (२५), महा.पोलीस अधिनियम कलम ३७ (१)(३) सह १३५, क्रिमी.ॲमे.ॲक्ट कलम ३ व ७ या गुन्हयाचे तपासामध्ये आरोपी नामे **१) राजु बापुराव देशमुख (टोळी प्रमुख)** वय २१ वर्षे रा. संतकृपा कॉम्पलेक्स रुम नं ०४, हनुमान मंदिराजवळ बालेवाडी गावठाण,बाणेर पुणे **२) शेखर संपत देशमुख** वय २६ वर्षे रा. संतकृपा कॉम्पलेक्स रुम नं ०४, हनुमान मंदिराजवळ बालेवाडी गावठाण,बाणेर पुणे **३) स्वप्नील वाल्मीकी कांबळे** वय २० वर्षे रा.पॅनकार्ड क्लब जवळ, बाणेर पुणे **४) हनुमान टिपन्ना राठोड** वय २१ वर्षे रा. विरभद्र नगर, सिल्व्हर स्टोन बिल्डींग, प्लॅट नं १ लेन नं ८ बाणेर पुणे **५) विनोद वाल्मीक कांबळे** वय २० वर्षे रा.पॅनकार्ड क्लब जवळ, बाणेर पुणे **६) दत्ता दादा कांबळे** वय २३ वर्षे रा.बालाजी किराणा स्टोअर्स मागे भेगडेनगर पाषाण पुणे यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. **सदर टोळी प्रमुख व त्याचे साथीदार यांच्यावर एकुण ०९ गुन्हे केल्याची नोंद आढळुन आलेली आहे.**

**३) एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणे** गु.र.नं ३६४/२०२४ बी.एन.एस. कलम १४०(२), १४२, ३०८(३), ३०८(४), ३०८(५), ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५), महा.पो.अधि.कलम १४२, ३७(१)(अ), १३५ या गुन्हयाचे तपासामध्ये आरोपी नामे **१) बाळासाहेब बळीराम बांगर (टोळी प्रमुख)** वय २९ वर्षे रा. शिक्षक कॉलनी, मेदनकरवाडी, चाकण पुणे **२) प्रविण दत्तात्रय भालेराव** वय २८ वर्षे रा.आणदेशे ता.मावळ जि.पुणे **३) अशोक गणेश शिरोळे** वय २५ वर्षे रा.डी-१०१ प्रिस्टभ्न ग्रीन्स सोसायटी, मोशी पुणे यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. **सदर टोळी प्रमुख व त्याचे साथीदार यांच्यावर एकुण ०९ गंभीर गुन्हे केल्याची नोंद आढळुन आलेली आहे.**

**४) एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणे** गु.र.नं ३१३/२०२४ भादवि. ३०७, ३४१, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४८, १४९, आर्म ॲक्ट कलम ४(२५), महा. पोलीस कायदा कलम ३७(१)(३) सह १३५ सह, क्रि.लॉ. ॲमे.

ॲक्ट कलम ३ व ७ या गुन्हयाचे तपासामध्ये आरोपी नामे **१) सुरज प्रकाश रणदिवे (टोळी प्रमुख)** रा घरकुल चिखली पुणे **२) विवेक विनोद नाईक ऊर्फ सोन्या** वय २० वर्षे रा.रा फ्लॅट नं १०/११ नळदुर्ग सोसायटी, बि.नं ए-७ पीएमआरडीए वसाहत, सेक्टर नं १२ खंडे वस्ती, भोसरी पुणे **३) सौरभ कानिफनाथ भोपळे** वय २० वर्षे रा. फ्लॅट न.११०५ केजळगड,सोसायटी,पीएमआरडी वसाहत, सेक्टर न १२ खंडे वस्ती, भोसरी पुणे, **४)अथर्व उदय पकाले** वय २० वर्षे रा. पीएमआरडीए वसाहत, सेक्टर नं १२ खंडे वस्ती, भोसरी पुणे **५) प्रतीक ज्ञानेश्वर सपकाळ** वय २८ वर्षे रा.दत्त मंदिरासमोर, दत्तमंदिर रोड, वाकड पुणे **६) लकी ऊर्फ लखन ऊर्फ सुनिल रामभाऊ पवार** वय २४ वर्षे रा.पाण्याच्या टाकीजवह, काळाखडक झोपडपट्टी, वाकड पुणे **७) चेप्या ऊर्फ केतन गणेश सोनवणे** वय २६ वर्षे रा.रुम नं ११ आर बिल्डींग, मिलींदनगर, पिंपरी पुणे **व इतर ०१** यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. **सदर टोळी प्रमुख व त्याचे साथीदार यांच्यावर एकुण ०४ गंभीर गुन्हे केल्याची नोंद आढळुन आलेली आहे.**

वरील **चारही टोळी प्रमुख** यांनी त्यांचे साथीदारांसह अन्य सदस्यांसाठी प्रत्येक गुन्हयात काही सामाईक व काही नवीन साथीदार यांना सोबत घेवुन स्वतःची संघटीत टोळी तयार करुन अवैध मार्गाने आर्थिक फायदा मिळवण्याचे उद्देशाने स्वतःचे गुन्हेगारी टोळीचे वर्चस्व व दहशत प्रस्थापित ठेवण्यासाठी संघटित गुन्हेगारी संघटनेचा प्रमुख म्हणुन किंवा संघटनेच्या वतीने एकटयाने किंवा संयुक्तपणे, हिंसाचाराचा वापर करुन अथवा हिंसाचाराची धमकी देवुन किंवा धाक दपटशहा दाखवुन टोळी प्रमुख व साथीदार यांनी **हिंजवडी,तळेगाव दाभाडे, वाकड,चिखली, चाकण, एमआयडीसी भोसरी, चिंचवड, निगडी,सांगवी चतुश्रृंगी, दत्तवाडी, कोथरुड, वडगाव मावळ, पौड, घोडेगाव** पोलीस स्टेशन हद्दीत **खुन, खुनाचा प्रयत्न करणे, गंभीर दुखापत, पळुन नेऊन बलात्कार करणे, खंडणी मागणे, दरोडा, अपहरण करणे, सदोष मनुष्यवध करण्याचा प्रयत्न करणे, जबरी चोरी, दुखापत, दरोडयाची तयारी, बेकायदेशिररित्या अग्निशस्त्रे जवळ बाळगणे, बेकायदेशीरपणे जिवघेणी हत्यारे जवळ बाळगणे,** अशा प्रकारेचे गंभीरे स्वरुपाचे चढत्या क्रमाने गुन्हे दाखल आहेत. प्रत्येक गुन्हा करताना त्यांनी वैयक्तिक व टोळीचे वर्चस्व वाढावे व आर्थिक फायदा व्हावा तसेच जनमाणसात दहशत रहावी हाच उद्देश ठेवुन टोळी प्रमुखाने गुन्हे केलेले आहेत.

सदर टोळीमधील सर्व आरोपी यांनी संघटीत गुन्हेगारी टोळी बनवुन हिंसाचाराचा वापर करुन वर्चस्वासाठी व आर्थिक फायदयासाठी संघटीतपणे गुन्हे करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचे विरुध्द महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ अतंर्गत कारवाई करणे बाबत प्रस्ताव पोलीस आयुक्त कार्यालय येथे सादर केला असता सदर प्रस्तावा मधील कागदपत्रांची छाननी करुन नमुद गुन्ह्यांत **महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१) (ii), ३ (४) या कलमांचा अंतर्भाव करण्याचे आदेश मा. श्री.वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड** यांनी पारीत केलेले आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. विनय कुमार चौबे, मा.पोलीस सह आयुक्त डॉ.शशिकांत महावरकर, मा.अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी, मा.पोलीस उप-आयुक्त श्री.संदिप डोईफोडे (गुन्हे), मा.पोलीस उप-आयुक्त डॉ.विशाल गायकवाड (परि-०२) मा.पोलीस उप-आयुक्त स्वप्ना गोरे मॅडम (परि-०१) मा.पोलीस उप-आयुक्त श्री.डॉ.शिवाजी पवार (परि-०३) मा.सहा.पोलीस आयुक्त श्री.विशाल हिरे (गुन्हे), यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि श्री.कन्हेया थोरात (हिंजवडी पोस्टे), वपोनि श्री.महेश बनसोडे (सांगवी पोस्टे) वपोनि श्री. गणेश जामदार (एमआडीसी भोसरी पोस्टे) पोलीस निरीक्षक श्री.अनिल देवडे (पी.सी.बी गुन्हे शाखा) सपोफौ सचिन चव्हाण, पोहवा व्यंकप्पा कारभारी (पीसीबी गुन्हे शाखा), पोहवा विनोद साळवे (सांगवी पोस्टे) पोना निलेश अरगडे, मपोना पुष्पांजली आहेर (एमआयडीसी भोसरी पोस्टे) पोशि शरद उभे (हिंजवडी पोस्टे) यांच्या पथकाने केली आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
**पिंपरी चिंचवड आयुक्तालय**